# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.सआ/मालमत्ता/ ४४१५३८ /प्र.अ(मक्ता)-१/२ दि. ०६.०१.२०२३.

**परिपत्रक क्र. २५ / २०२२-२३**

**विषय:** महानगरपालिकेच्या मक्त्याने दिलेल्या भूभागावरील इमारती/ इमारतीतील जागा/सभागृह तसेच मोकळ्या जागा/खेळाची मैदाने यांचा लग्न समारंभ, धार्मिक आणि सामाजिक समारंभ यासाठी होणाऱ्या वापराच्या बाबतीतील दरामध्ये सुधारणा करण्याबाबत.

**संदर्भ:** १) महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/एफ/७५४७ दि. २१.०९.२०२२ अन्वयेची प्रशासकीय मंजुरी

२) प्रशासक (सुधार समिती) ठराव क्र. ७३ दि. १६.११.२०२२

२) प्रशासक (महानगरपालिका) ठराव क्र. ११०२२ दि. २२.११.२०२२

**प्रस्तावना -**

महानगरपालिकेने तथा तत्कालिन विश्वस्त सुधार योजनेअंतर्गत विविध भूभाग व्यक्ती / संस्था यांना मक्त्याने दिलेल्या आहेत. मक्त्याने दिलेल्या भूभांगावरील इमारती वा त्यामधील सभागृहे लग्नसमारंभ आणि असेच सामाजिक आणि धार्मिक समारंभ यासाठी वाजवी शुल्क आकारुन भाड्याने देण्यास परवानगी देण्याबाबत सुधार समिती ठराव क्र. २०२ दि. २३.०९.२००२, महानगरपालिका ठराव क्र. १३८६ दि. ०९.१२.२००२ अन्वये तसेच मक्त्याने दिलेल्या भूभागावरील खेळाची मैदाने/मोकळ्या जागा यावर लग्न व इतर समारंभ करण्याकरिता परवानगी देण्याबाबत सुधार समिती ठराव क्र. १०५ दि. २३.०९.२००३, महानगरपालिका ठराव क्र. १०५५ दि. ०५.०२.२००४ आणि शैक्षणिक उद्दिष्टांकरीता असलेल्या संस्थांना मक्त्याने दिलेल्या भूभागावरील विवाह व इतर कार्यक्रमाबाबत सुधार समिती ठराव क्र. ९ दि. ०७.०५.२०१४, महानगरपालिका ठराव क्र. २४५ दि. २६.०६.२०१४ अन्वयेच्या प्रचलित धोरणांनुसार शुल्क आकारणी करण्यात येते. याकरीता उपरोक्त तीन स्वतंत्र धोरणे सद्यस्थितीत प्रचलित आहेत. सदर धोरणात नमूद केलेले दर हे त्यापूर्वीच्या धोरणातील दरात १० पट वाढ करून सन २००० पासून अंमलात आलेले आहेत. महानगरपालिकेचे विविध भूभाग व्यक्ती/संस्था यांना मक्त्याने दिलेल्या भूभागांपैकी काही भूभागांवरील इमारती/ इमारतीतील जागा/सभागृह तसेच मोकळ्या जागा/खेळाची मैदाने यांचा लग्न समारंभ, धार्मिक आणि सामाजिक समारंभ यासाठी भाड्याने देण्यास परवानगी देऊन त्यापोटी महानगरपालिकेस प्राप्त होणा-या भुईभाड्याचे दरामध्ये वाढ / सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे.

महानगरपालिकेने तथा तत्कालिन विश्वस्त सुधार योजनेअंतर्गत विविध भूभाग व्यक्ती / संस्था यांना मक्त्याने दिलेल्या भूभागांपैकी काही भूभागांवरील इमारती/ इमारतीतील जागा/सभागृह तसेच मोकळ्या जागा/खेळाची मैदाने यांचा लग्न समारंभ, धार्मिक आणि सामाजिक समारंभ यासाठी भाड्याने देण्यास परवानगी देण्याकरीताचे शुल्कांमध्ये वाढ व अटीशर्तींमध्ये सुधारणा करून एकत्रित धोरण खालीलप्रमाणे निश्चित करुन सदर धोरणास महानगरपालिका आयुक्त यांची क्र.एमजीसी/एफ/७५४७ दि. २१.०९.२०२२ अन्वये प्रशासकीय मंजुरी तसेच प्रशासक (सुधार समिती) यांची ठराव क्र. ७३ दि.१६.११.२०२२ अन्वये व प्रशासक (महानगरपालिका) यांची ठराव क्र. ११०२२ दि. २२.११.२०२२ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

**सुधारीत धोरण**

महानगरपालिकेने तथा तत्कालिन विश्वस्त सुधार योजनेअंतर्गत मक्त्याने दिलेले महानगरपालिकेचे भूभाग यांवरील शैक्षणिक, धर्मादाय आणि धार्मिक संस्था तसेच व्यापारी केंद्र/क्लब/संस्था आणि इतर खाजगी संस्था यांना अशा बांधलेल्या इमारती किंवा त्यातील सभागृहे, लग्नसमारंभ, सामाजिक आणि धार्मिक समारंभ यासाठी भाड्याने देण्यासाठी अतिरीक्त भूभाड्याचे दर, अटी व शर्ती खालीलप्रमाणे एकत्रितरित्या सुधारित करण्यात येत असून दि. ०१.०४.२०२२ पासून अंमलात येतील.

१)

| अ.क्र. | वर्गवारी | अतिरीक्त भूईभाडे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ | शैक्षणिक वापराव्यतिरिक्त इतर उद्दिष्टांकरीता विविध व्यक्ती / संस्था यांना मक्त्याने दिलेले महानगरपालिकेचे मुंबई शहर व उपनगरातील भूभागांवरील इमारती / इमारतीतील सभागृह / जागा यांकरीता | रु.१,५०,०००/- प्रतिवर्षी प्रति सभागृह किंवा संपूर्ण वर्षात वसूल केलेल्या एकूण ठोक रकमेच्या ३३% जे जास्त असेल ते भूभाडे |
| ब | शैक्षणिक वापराकरीता विविध व्यक्ती / संस्था यांना मक्त्याने दिलेले महानगरपालिकेचे मुंबई शहर व उपनगरातील भूभागांवरील इमारती / इमारतीतील सभागृह / जागा यांकरीता | रु.१,५०,०००/- प्रतिवर्षी प्रति सभागृह किंवा संपूर्ण वर्षात वसूल केलेल्या एकूण ठोक रकमेच्या १०% जे जास्त असेल ते भूभाडे |
| क | विविध व्यक्ती/संस्था यांना मक्त्याने दिलेल्या भूभागांवरील मोकळ्या जागा/खेळाची मैदाने यावर लग्न समारंभ आणि इतर सामाजिक आणि धार्मिक समारंभ करण्यासाठी | i) ५०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रफळाच्या भूभागाकरीता - रु.१,५०,०००/- प्रतिवर्षी किंवा संपूर्ण वर्षात वसूल केलेल्या एकूण ठोक रकमेच्या ३३% जे जास्त असेल ते भूभाडे<br>ii) ५०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूभागाकरीता - रु.५०,०००/- प्रती समारंभ किंवा संपूर्ण वर्षात वसूल केलेल्या रकमेच्या ३३% यापैकी जे जास्त असेल ते भूभाडे |

२) इमारत/सभागृह/मोकळ्या जागा यांचा वापर केवळ लग्नसमारंभ आणि अशा प्रकारच्या सामाजिक / धार्मिक समारंभ यासाठी अनुज्ञेय असेल. व्यावसायिक कारणासाठी वापर करण्यापूर्वी सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) विभागाची रु.२,००,०००/- प्रति समारंभ इतकी रक्कम भरण्यासापेक्ष, सर्व अटी व शर्तींच्या अधीन राहून स्वतंत्र परवानगी घ्यावी लागेल. विना परवानगी व्यावसायिक कारणासाठी वापर केल्यास इमारत/सभागृह/मोकळ्या जागा यांना देण्यात आलेली मान्यता चालू आर्थिक वर्षाकरीता रद्द करुन भरलेली अनामत रक्कम उपरोक्त अनुक्रमांक १ मध्ये नमूद सर्व प्रकरणांत जप्त करण्यात येईल व पुढील वर्षी नव्याने अनामत रक्कम भरणा करावी लागेल.

३) खाद्यपेय व्यवस्था सेवा आणि/ किंवा सजावटीसाठी मध्यस्थ/प्रबंधक/व्यवस्थापक (एजंट) नेमून किंवा करार प्रदान करुन एकाधिकारशाही मार्गाने खाद्यपेय व्यवस्था सेवा आणि सजावट यासाठी मक्तेदार/ संस्था यांनी कराराची प्रत सादर करून संपूर्ण वर्षात वसूल केलेल्या ठोक रक्कमेच्या ३३% रक्कम महानगरपालिकेकडे भरली पाहिजे. 'एकाधिकारशाही' नसल्यास प्रत्येक वर्षीच्या सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले कार्यक्रमाचे लेखा विवरण पत्र तसेच संस्थेने ताळेबंद पत्रासोबत एकाधिकारशाही नसल्याचे लेखी कळविले पाहिजे.

४) मक्तेदार / संस्थांनी सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले कार्यक्रमाचे लेखा विवरण पत्र तसेच संस्थेचे ताळेबंद पत्र प्रत्येक आर्थिक वर्ष संपल्यानंतर सादर करणे व त्यानुसार येणा-या अतिरिक्त भुईभाड्याचा भरणा करणे बंधनकारक असेल. तसेच परिशिष्ट 'अ' येथे नमूद केलेल्या विवरणपत्रासह अतिरिक्त भुईभाड्याचा भरणा मक्तेदाराने आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० जून पुर्वी करावा अन्यथा आर्थिक वर्षाच्या सुरवातीपासून (म्हणजेच ०१ एप्रिल पासून) १२% दराने वा प्रचलित धोरणानुसार दंड आकारला जाईल. (परिशिष्ट 'अ' सोबत जोडले आहे.)

५) अतिरिक्त भूईभाड्याचा भरणा करतेवेळी अनुज्ञेय असलेले सर्व कर मक्तेदार/संस्थेने भरले पाहिजेत.

६) अटींची विश्वासार्ह पूर्तता करण्यासाठी मक्तेदार / संस्थेने इमारत / सभागृह / मोकळ्या जागा / खेळाची मैदाने यावरील सभागृह / मैदान / मंडप यांच्या वापरासाठी प्रति सभागृह / मैदान / मंडप याकरीता एका वर्षाच्या अतिरिक्त भुईभाड्यापोटी असलेली किमान रक्कम म्हणजेच एकूण रु. १,५०,०००/- इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून भरली पाहिजे.

७) संस्थेची इमारत/सभागृह, मोकळ्या जागा ह्या लग्नसमारंभ आणि अशा प्रकारचे धार्मिक आणि सामाजिक समारंभ यासाठी वापरण्याची परवानगी वार्षिक तत्वांवर असेल आणि एका वेळेस जास्तीत जास्त तीन वर्षाकरिता देण्यात येईल. असे समारंभ/कार्यक्रम करण्याकरीता सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) विभागाची परवानगी न घेता वापर केल्यास वार्षिक रु. १,००,०००/- इतका दंड आकारला जाईल.

८) संपूर्ण वर्षामध्ये इमारत / सभागृह यांचा लग्नसमारंभ आणि इतर अशा प्रकारची सामाजिक आणि धार्मिक समारंभ यासाठी वापर फक्त १५० दिवसांसाठी करता येईल.

९) कार्यक्रमस्थळी खाद्यपदार्थ शिजवण्याकरीता मक्तेदार / संस्था यांनी त्या त्या विभागाचे वैद्यकिय आरोग्य अधिकारी आणि अग्निशमन विभागाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल.

१०) मक्तेदारास/संस्थेस प्रत्येक सभागृहात आयोजित होणा-या समारंभाकरीता पक्षकारांकडून आकारल्या जाणा-या भाड्याच्या, सभागृहाप्रमाणे स्वतंत्र नोंदवह्या परिरक्षित करणे व सदर नोंदवह्या मागणीनुसार पडताळणीकरीता महानगरपालिकेस तात्काळ उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

११) मक्ता भुभागावर आयोजित करण्यात येणा-या प्रत्येक समारंभास/कार्यक्रमास विभाग कार्यालयाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घ्यावी लागेल. सहाय्यक आयुक्त, विभाग कार्यालय मक्तेदारास अशी पूर्व परवानगी विनाशुल्क देतील व त्याची एक प्रत सहाय्यक आयुक्त (मालमत्ता), सहाय्यक अभियंता (जल कामे), वैद्यकिय आरोग्य अधिकारी, सहाय्यक अभियंता (परिरक्षण), सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने), सहाय्यक अभियंता (घकव्य), संबंधित

क्षेत्रातील अग्निशमन केंद्रातील अग्निशमन अधिकारी, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक (वाहतूक) यांना पाठवून अवगत करतील. संबंधित विभागातील मालमत्ता अधिकारी या बाबत समन्वयक म्हणून काम पाहतील.

१२) अतिरिक्त भूभाडयाच्या आकारणीसाठी इमारत/सभागृहाव्यतिरिक्त भूभागावरील मोकळ्या जागेत केलेली स्वतंत्र मंडपाची उभारणी हे अतिरिक्त सभागृह म्हणून समजले जाईल व त्याप्रमाणे अशा अतिरिक्त सभागृहाकरीता अनु. क्र १ नुसार मक्तेदारास अतिरिक्त भुईभाड्याचा भरणा करावा लागेल.

१३) शैक्षणिक संस्थाना दिलेल्या भुभागांबाबत मोकळ्या जागा/ इमारत/ सभागृह यांचा लग्नसमारंभ आणि इतर अशा प्रकारच्या सामाजिक / धार्मिक समारंभ यासाठी वापर ज्यावेळी शाळा नसेल तेव्हाच म्हणजेच फक्त रविवार, शैक्षणिक सुट्ट्या, दिवाळी, नाताळ आणि उन्हाळ्याची सुट्टी असेल तेव्हाच करता येईल.

१४) परिसरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारचा त्रास विशेषत: रात्री १०.०० ते सकाळी ७.०० या कालावधीमध्ये होऊ नये यासाठी संस्थेने/मक्तेदाराने पुरेशी काळजी घेतली पाहिजे.

१५) मध्यरात्री १२.०० ते सकाळी ६.०० या कालावधीमध्ये दिवे बंद केले गेले पाहिजेत.

१६) अशा समारंभासाठी लाऊड स्पिकर, बँड इत्यादीचा वापर करण्यास बंदी घालण्याची जबाबदारी संस्थेने/मक्तेदाराने स्विकारली पाहिजे.

१७) संबंधित महानगरपालिका विभाग कार्यालयाकडून पूर्व परवानगी घेतल्याखेरीज जागेवर कोणत्याही प्रकारचे तात्पुरते बांधकाम संस्थेस/मक्तेदारास उभारता येणार नाही.

१८) जागेच्या, मनोरंजनाच्या जागेवर आणि सक्तीच्या मोकळ्या जागांवर संस्थेने/मक्तेदाराने अतिक्रमण करता कामा नये.

१९) संस्थेने/मक्तेदाराने जादा पाण्याचा आकार, विद्युत आकार, घन कचरा व्यवस्थापन खात्यांची लागणारी जादा सेवा मिळविण्यासाठीचे आकारदेखील भरले पाहिजेत.

२०) संस्थेने परिशिष्ट 'ब' येथे नमूद महानगरपालिकेच्या व शासनाच्या विविध विभागांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तसेच वेळोवेळी महानगरपालिकेने वा शासनाने निर्देशित केल्यानुसार विविध विभागांच्या सक्षम प्राधिका-यांकडून त्यांचे देय असलेले शुल्क भरून आवश्यक ती पूर्व परवानगी घेतली पाहिजे. (परिशिष्ट 'ब' सोबत जोडले आहे.)

२१) सभागृह / इमारती / मोकळ्या जागा इत्यादी महानगरपालिकेच्या आरोग्य अधिका-यांचे समाधान होईल, अशा प्रकारे आरोग्यदायी स्थितीमध्ये ठेवावे लागेल. त्याचप्रमाणे तेथे निर्माण होणा-या ओला व सुक्या कच-याची महानगरपालिका अधिका-यांचे समाधान होईल अशा प्रकारे विल्हेवाट लावणे बंधनकारक असेल.

२२) महानगरपालिका आयुक्तांनी वेळोवेळी लागू केलेल्या अशा सर्व अटींचे पालन संस्थेस/मक्तेदारास करणे बंधनकारक असेल. अटींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२३) मक्तेदार / संस्था लग्न समारंभ / धार्मिक / सामाजिक कार्यक्रमांकरीता इतर संस्थांशी भूभागासंदर्भात व्यवस्थापनाकरीता परस्पर कोणताही करार करणार नाहीत. अशा प्रकारे करार केल्याचे निदर्शनास आल्यास मुळ मक्ता करार एकतर्फी रद्द करण्यात येऊन भूभाग ताब्यात घेण्याची कारवाई महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

२४) लग्नसमारंभ, सामाजिक व धार्मिक समारंभाकरीता खेळाची मैदाने आणि मोकळ्या जागा वापरण्यास देण्यात येणा-या परवानगी, मान्यता ह्या प्राप्त वापरातील तात्पुरता बदल असल्याने या संदर्भात मक्तेदारास भविष्यात कोणतेही हक्क प्रस्थापित करता येणार नाहीत.

२५) अनु क्र. १ व २ येथील दरांमध्ये दर वर्षी दि. ०१ एप्रिल रोजी पूर्वीच्या दरात ५% वाढ करून येणारी रक्कम पुढील १००० च्या पटीत पूर्णांकित करून आलेले दर आकारले जातील. यासाठी स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येणार नाही.

२६) महालक्ष्मी रेसकोर्स व तत्सम मोठ्या आकाराचे मोकळ्या भूभागांवरील कार्यक्रम/समारंभ याकरीता आकारावयाचे अतिरिक्त भूईभाडे याबाबत प्रकरणनिहाय स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

२७) मक्ता करारातील अटी व शर्ती सह प्रस्तावित धोरणातील अटी व शर्ती लागू राहतील.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlestate या संकेतस्थळावर सदर परिपत्रकाची प्रत उपलब्ध आहे.

06/01/23

**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)**

क्र.सआ/मालमत्ता/ ४४१५३८ /प्र.अ(मक्ता)-१/२ दि. ०६.०१.२०२३.

**परिपत्रक क्र. २५ / २०२२-२३**

**प्रत -**

प्रत ............................................... यांना माहितीकरीता आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

6.1.2023 | 06/01/2023
प्रशासकीय अधिकारी (मक्ता) -१ | प्रशासकीय अधिकारी (मक्ता) - २

**परिशिष्ट 'अ'**

मक्तेदाराचे नाव व भूभाग क्र. -
आर्थिक वर्ष -
दि.

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
४ था मजला, महानगरपालिका विस्तारित इमारत,
महापालिका मार्ग,
मुंबई - ४०० ००१.

महोदय,

आपल्या कार्यालयाकडून प्राप्त परवानगी क्र. .................... दि. .................. नुसार आम्ही अनामत रक्कमेचा पावती क्र. ................... दि. ............. अन्वये भरणा केला असून आर्थिक वर्ष २०...... मध्ये आमच्या सभागृहात / मोकळ्या मैदानावर / खेळाच्या मैदानावर खालील नमूद ......... (संख्या) कार्यक्रम झाले. त्यासाठी आम्ही स्विकारलेले शुल्क, त्यातील महानगरपालिकेस देय ३३% हिस्सा / १०% हिस्सा (किंवा रु............./- किमान) तसेच इतर सेवांवर एकाधिकार पध्दतीने सेवा पुरवठादारांकडून प्राप्त महसूलाचा तपशील, आमच्या सनदी लेखापालांनी पडताळून प्रमाणित केल्याप्रमाणे सादर केला आहे. आमच्या भूखंडाचा मंजूर वापर 'शैक्षणिक' आहे / नाही.

तक्ता 'अ'

| अ.क्र. | विभाग कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांचा परवानगी क्र. व दि. | कार्यक्रमाचा संक्षिप्त तपशील | कार्यक्रम करणाराचा तपशील | आम्ही या कार्यक्रमासाठी स्विकारलेली एकूण रक्कम रु. | त्यातील महानगरपालिकेचा ३३% हिस्सा / १०% हिस्सा रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| एकूण | | | | रु. | रु. |

तक्ता 'ब'

| अ.क्र. | आमच्या सभागृह /मोकळी जागा / खेळाचे मैदान येथे एकाधिकार पद्धतीने सेवा पुरवठादार यांचा तपशील | आम्ही स्विकारलेले वार्षिक परवाना / अनुमती शुल्क रु. | त्यातील महानगरपालिकेस देय ३३% हिस्सा रु. |
|---|---|---|---|
| १ | | | |
| एकूण | | रु. | रु. |

मक्तेदाराची स्वाक्षरी

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**परिशिष्ठ 'ब'**

महानगरपालिका तसेच शासनाच्या विविध विभागांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून त्यांचे देय असलेले शुल्क भरून आवश्यक ती पूर्व परवानगी घेतली पाहिजे.

| अ.क्र. | परवानगी | परवानगी शुल्क | परवानगी देणारे प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | वार्षिक परवानगी (एका वेळेस कमाल तीन वर्षाकरीता) | --- | सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) |
| २ | सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) खात्याकडून वरील १ प्रमाणे परवानगी प्राप्त केल्यानंतर, प्रत्येक कार्यक्रमाकरीता स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक राहील, व त्याची प्रत वैद्यकिय आरोग्य अधिकारी, सहा. अभियंता (परिरक्षण), सहा. अभियंता (इमारत व कारखाने), सहा. अभियंता (घकव्य), संबंधित क्षेत्रातील अग्निशमन केंद्रातील अग्निशमन अधिकारी, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक (वाहतूक) | --- | संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त |
| ३ | अग्निशमन विभागाची नाहरकत | संबंधित विभागाच्या धोरणानुसार | अग्निशमन केंद्रातील अग्निशमन अधिकारी, |
| ४ | तात्पुरत्या स्वरुपात मंच/मंडप/पंडॉल उभारण्याकरीता | संबंधित विभागाच्या धोरणानुसार | सहा. अभियंता (इमारत व कारखाने) |
| ५ | रस्ता/पदपथ येथे अडथळा निर्माण करून तात्पुरत्या स्वरुपात वापर करण्याकरीता | संबंधित विभागाच्या धोरणानुसार | सहा. अभियंता (परिरक्षण) |
| ६ | कार्यक्रमस्थळी अन्न शिजवण्याकरीता | संबंधित विभागाच्या धोरणानुसार | वैद्यकिय आरोग्य अधिकारी व अग्निशमन केंद्रातील अग्निशमन अधिकारी |
| ७ | सार्वजनिक उपद्रव कारक घनकचरा पदार्थांचे वर्गीकरण, व विल्हेवाट लावण्याकरीता | संबंधित विभागाच्या धोरणानुसार | सहा. अभियंता (घकव्य) |
| ८ | लाऊड स्पिकर, बॅंड इ. वापर करण्याकरीता | संबंधित विभागाच्या धोरणानुसार | स्थानिक पोलिस ठाण्यातील वरीष्ठ पोलीस निरीक्षक |
| ९ | रस्त्यांवर वाहने उभी करण्याबाबत | संबंधित विभागाच्या धोरणानुसार | स्थानिक पोलीस निरीक्षक (वाहतूक) |

विभाग कार्यालयातील मालमत्ता अधिकारी सदर बाबतीत समन्वयक म्हणून काम पाहतील.

प/133

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र.म.स./८९६३/सु.स.
मुंबई, दि.२३नोव्हेंबर २०२२.

**संदर्भ** : आपला दि. १८.११.२०२२ चा ज्ञाप क्र. एमसीटी/३८३२.

प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालिका हयांनी दि. १६ नोव्हेंबर २०२२ रोजी पुढील ठराव मंजूर केला आहे असे मी आपणांस कळवू इच्छितो :-

**विषय क्रमांक ८ (नोव्हेंबर २०२२).**

**"संदर्भ : आयुक्तांचे दि. १४.११.२०२२ चे पत्र क्र. सआ/मालमत्ता/९९६५/ प्र.अ.(मक्ता)-१/२.**

**प्रशासक (सुधार समिति) ठराव क्रमांक ७३.** "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या परिस्थितीत, सुधार समितीने आपला दि. ७ मे २०१४ चा ठराव क्र. ९ आणि दि. २३ सप्टेंबर २००३ चा ठराव क्र. १०५ अन्वये संमत केलेल्या पूर्वीच्या आदेशात अंशत: फेरफार करुन, प्रशासक (महानगरपालिका) हयांना महानगरपालिकेचा दि. २६ जून २०१४ चा ठराव क्र. २४५ आणि दि. ५ फेब्रुवारी २००४ चा ठराव क्र. १०५५ च्या संदर्भात अशी शिफारस करण्यात येत आहे की, महानगरपालिकेने तथा तत्कालीन विश्वस्त सुधार योजनेअंतर्गत मक्त्याने दिलेल्या भूभागासंदर्भात, त्याच पत्राच्या परिच्छेद ३ मधील तक्त्यातील रकाना क्र. २ येथे दर्शविल्याप्रमाणे वर्गवारीनिहाय मक्त्याने दिलेल्या भूभागांकरिता, त्याच तक्त्यातील रकाना क्र. ३ येथे नमूद केल्यानुसार अतिरिक्त भुईभाडे आकारण्यास आणि त्याच परिच्छेदातील अ.क्र. १) ते २७) येथे नमूद केलेले सुधारित धोरण दि. १ एप्रिल २०२२ पासून अंमलात आणण्यास, अद्ययावत् सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६ क (१) अन्वये, प्रशासकांस प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, सुचविल्याप्रमाणे, हयाद्वारे, मंजुरी देण्यात यावी."

**महानगरपालिका सचिवांकरिता.**

**प्रशासकीय अधिकारी (समिति).**

प्रशासकीय अधिकारी (समिति)
मनपा आयुक्तांचे कार्यालय
23 NOV 2022
समय : 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18
क्रमांक : MCT/३८९९

क्र. एमसीटी /३८९९
दिनांक २३/११/२२
सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)
प्रत माहितीसाठी आणि कार्यवाहीसाठी रवाना
२३/११/२२
प्रशासकीय अधिकारी (समिती)
आयुक्तांचे कार्यालय

बृहन्मुंबई महानगर पालिका
सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)
बृहन्मुंबई महानगर पालिका मुख्यालय ४ था मजला,
विस्तारित इमारत, महानगर पालिका मार्ग, मुंबई-४००००१

23 NOV 2022

431700

क्रमांक

वेळ-११,१२,१३,१४,१५,१६,(१७)

कार्य. अभि / स.अ.(सु-१)/स.अ.(सु-२)/स.अ.(सु-३) स.अ.(सु-४)
प्रशा. अधि.(म.-१)/प्रशा.अधि.(म.-२)/वरिष्ठ लघुलेखक
प्रशा. अधि.(स.गृ.सं.)/व.प्रशा.अधि.(पीएपी/झोपुप्रा/गृ.सोसा.)
प्रशा. अधि.(वाटप)/प्रशा.अधि.(लेखा)/प्रशा.अधि.(संगणक)
प्रशा. अधि.(स.सा.)/मु.लि.(अभिलेख)
अतिमहत्वाचे/तात्काळ/पी. आय. पी.
अभ्यासून योग्य कार्यवाही करावी आणि
सहा.आयु.(मालमत्ता) यांना........दिवसांत अहवाल सादर करावा

सहा.आयु.(मालमत्ता.)/कार्य.अभि.(मालमत्ता)/प्रशा.अधि.(मालमत्ता)

pm 23/11 25.11.22

HCL/1

28-11-2022
AOLB1

28/11/2022
AOLB2

.HC
01.12.2022
HCLB1

प/135

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**विषय क्रमांक ५३ (नोव्हेंबर २०२२).**
महानगरपालिका कार्यालय,
क्रमांक: म.स./70269/प्रशासक (मनपा.)
मुंबई, दिनांक 02 डिसेंबर २०२२.
2/01/2023

संदर्भ : दि. २२.११.२०२२ चा ज्ञाप क्र. एमसीटी/३८५४.

प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालिका ह्यांनी दि. २२ नोव्हेंबर २०२२ रोजी पुढील ठराव मंजूर केला आहे, असे मी आपणांस कळवू इच्छितो :-

दिनांक २२ नोव्हेंबर २०२२ चा प्रशासक (महानगरपालिका) ठराव क्रमांक ११०२२ :-

"संदर्भ:-१) आयुक्तांचे दि. १४.११.२०२२ चे पत्र क्र. सआ/ मालमत्ता/९९६५/प्र.अ.(मक्ता)-१/२; आणि २) प्रशासक (सुधार समिति) ह्यांचा दि. १६.११.२०२२ चा ठराव क्र. ७३.

"आयुक्तांच्या उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या परिस्थितीत, महानगरपालिकेने तिच्या दि. ५ फेब्रुवारी २००४ चा ठराव क्र. १०५५ आणि दि. २६ जून २०१४ चा ठराव क्र. २४५ अन्वये संमत केलेल्या पूर्वीच्या आदेशांत अंशत: फेरफार करुन, महानगरपालिकेने तथा तत्कालीन विश्वस्त सुधार योजनेअंतर्गत मक्त्याने दिलेल्या भूभागावरील इमारतीतील जागा/सभागृह, लग्न, धार्मिक व सामाजिक समारंभ ह्याकरिता भाडयाने देण्यासाठी, त्याच पत्राच्या परिच्छेद ३ मधील अ. क्र. १) ते २७) येथे नमूद केल्याप्रमाणे, अतिरिक्त भूभाडयाचे दर आणि अटी व शर्तींबाबतच्या सुधारित धोरणास आणि सदर धोरण दि. १ एप्रिल २०२२ पासून अंमलात आणण्यास, अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) अन्वये प्रशासकांस प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, सुचविल्याप्रमाणे, ह्याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे."

महानगरपालिका सचिवांकरिता.

प्रशासकीय अधिकारी (समिति),
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय.

प्रशासकीय अधिकारी (समिति)
मनपा आयुक्तांचे कार्यालय
02 JAN 2023
समय : ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८
क्रमांक : MCT/४४७८

क्र. एमसीटी / ४४७८
दिनांक 02/1/2023
सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)
प्रत माहितीसाठी आणि कार्यवाहीसाठी रवाना

प्रशासकीय अधिकारी (समिती)
आयुक्तांचे कार्यालय
2/1/2023

बृहन्मुंबई महानगर पालिका
सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)
बृहन्मुंबई महानगर पालिका मुख्यालय ४ था मजला,
विस्तारीत इमारत, महानगर पालिका मार्ग, मुंबई-४००००१

- 3 JAN 2023

क्रमांक 441538

वेळ-११,१२,१३,१४,१५,१६,१७

कार्य. अभि / स.अ.(सु-१)/स.अ.(सु-२)/स.अ.(सु-३) स.अ.(सु-४)
प्रशा. अधि.(म.-१)/प्रशा.अधि.(म.-२)/वरिष्ठ लघुलेखक
प्रशा. अधि.(स.गृ.सं.)/व.प्रशा.अधि.(पीएपी/झोपुप्रा/गृ.सोसा.)
प्रशा. अधि.(वाटप)/प्रशा.अधि.(लेखा)/प्रशा.अधि.(संगणक)
प्रशा. अधि.(स.सा.)/मु.लि.(अभिलेख)
अ.लेमहत्वाचे/तात्काळ/सही. आय. पी.
अभ्यासून योग्य कार्यवाही करावी आणि
सहा.आयु.(मालमत्ता) यांना.......दिवसांत अहवाल सादर करावा

06/01/23

सहा.आयु.(मालमत्ता.)/कार्य.अभि.(मालमत्ता)/प्रशा.अधि.(मालमत्ता)

3/1/23

HCL1

5.1.2023
AO LM

05/01/2023
AO LB2